| 4 | **Mr. Uttam Kirdak,** (1) Krishna Colony, Chawl No.1/3, Tees Gaon, Kalyan East - 421306 (2) Kamraj Nagar, Room No.8, Mangala Society, 101, Near Anthony Church, Ghatkopar, Mumbai - 400077 **Mr. Sharad Nivruti Kirdak (Guarantor)** Krishna Colony, Chawl No.1/3, Tees Gaon, Kalyan East, Mumbai - 421306 **Mr. Sanjay B Shinde (Guarantor)** (1) B1-001, Aditya Complex, Plot No.21, Sector 21, Kamothe, Navi Mumbai 410209 (2) S/O Baban Shinde, Hanmantwadi, Shinde Nagar, Satara, Maharashtra - 415523 (Home Loan A/c No. 65056159246, 65249777694) | Flat No.307, 3rd Floor, B Wing, Plot No.4, Pushp Ganga Partment, Sector 9, Kamothe, Navi Mumbai - 410216. | 17/12/2025 Date of NPA : 01/12/2020 | Rs. 18,38,340/- as on 17/12/2025 |

**The above Borrower(s) and/or their Guarantor(s) (whenever applicable) are hereby called upon to make payment of outstanding amount within 60 days from the date of publication of this notice,** failing which further steps will be taken after expiry of 60 days from the date of this notice under sub-section (4) of section 13 of Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002.

***The borrowers attention is invited to provision of sub-section (8) of section 13 of the Act, in respect of time available to redeem the secured assets.***

Date: 29/12/2025, Place: Navi Mumbai Authorised Officer, State Bank of India

## Muthoot Homefin (India) Ltd.

Corporate Office: Unit No. 19-NE, 19th Floor, The Ruby, Senapati Bapat Marg, Near Ruparel College, Dadar (West), Mumbai, Maharashtra - 400 028

**DEMAND NOTICE**

Under Section 13(2) of the Securitisation And Reconstruction of Financial Assets And Enforcement Of Security Interest Act, 2002 read with Rule 3 (1) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002.

The undersigned is the Authorised Officer of Muthoot Homefin (India) Ltd. (MHIL) under Securitisation And Reconstruction Of Financial Assets And Enforcement of Security Interest Act, 2002 (the said Act). In exercise of powers conferred under Section 13(2) of the said Act read with Rule 3 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002, the Authorised Officer has issued Demand Notices under section 13(2) of the said Act, calling upon the following Borrower/s (the "said Borrower"), to repay the amounts mentioned in the respective Demand Notice/s issued to them that are also given below.

In connection with above, Notice is hereby given, once again, to the said Borrower to pay to MHIL, within 60 days from the publication of this Notice, the amounts indicated herein below, together with further interest at 2% p.m. as detailed in the said Demand Notices, from the dates mentioned below till the date of payment and/or realization, payable under the loan agreement read with other documents/writings, if any, executed by the said Borrowers. As security for due repayment of the loan, the following assets have been mortgaged to MHIL by the said Borrowers respectively.

| Sr. No. | Name of the Borrower(s)/ Co-Borrower(s)/ Guarantor/ Loan Account No./Branch | Total Outstanding Dues (Rs.) | Date of Demand Notice | Description of secured asset (immovable property) |
|---|---|---|---|---|
| 1. | Archana Rajendra Mahajan/Pravin Rajendra Mali/ JAL-NHL-001451/ Jalgaon | Rs.5,92,386/- Rupees Five Lakh Ninety Two Thousand Three Hundred Eighty Six Only. | 22-Dec-2025 | Grampanchayat Property No. 7/3, Gat No. 399/2/2, Plot No. 7, Total Adm. 300.23 Sq.Mt., Out of which Adm. 46.00 Sq.Mt., I.e 495.00 sq.mtrs, Kalamsare, Tq. Amalner, Dist. Jalgaon-425402 The boundaries of above said plot is as under : Towards East- Remaining Portion of said plot, Towards West - Remaining Portion of said plot, Towards North - 9 Meter Road, Towards South - Remaining Portion of said plot |

If the said Borrowers shall fail to make payment to MHIL as aforesaid, MHIL shall proceed against the above secured assets under Section 13(4) of the Act and the applicable Rules, entirely at the risks of the said Borrowers as to the costs and consequences. The said Borrowers are prohibited under the Act from transferring the aforesaid assets, whether by way of sale, lease or otherwise without the prior written consent of MHIL. Any person who contravenes or abets contravention of the provisions of the said Act or Rules made thereunder, shall be liable for imprisonment and/or penalty as provided under the Act.

**Date: December 30, 2025,** **Sd/-Authorized Officer,**
**Place: Jalgaon** **Muthoot Homefin (India) Limited**

## फास्ट न्यूज

### रुपया आठ पैशांनी घसरून ८९.९८ वर

मुंबई : परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची विक्री आणि देशांतर्गत शेअर बाजारातील नकारात्मक वातावरणामुळे भारतीय रुपया आज अमेरिकी डॉलरच्या तुलनेत आठ पैशांनी घसरून ८९.९८ वर बंद झाला. परदेशी गुंतवणूकदारांकडून सतत भांडवल काढून घेणे आणि आयातदारांकडून डॉलरची वाढलेली मागणी यामुळे गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम झाला, असे परकी चलन व्यापाऱ्यांनी सांगितले. आंतरबँक परकी चलन बाजारात, रुपया डॉलरच्या तुलनेत ८९.९५ वर उघडला आणि दिवसभरात त्याने ८९.९९ चा नीचांक आणि ८९.८८ चा उच्चांक गाठला.

### ‘टोनबो इमेजिंग’तर्फे ‘आयपीओ’साठी अर्ज

मुंबई : जागतिक संरक्षण इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक कंपनी टोनबो इमेजिंग इंडिया लि.ने ‘आयपीओ’साठी भांडवली बाजार नियामक ‘सेबी’कडे आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केला आहे. कंपनीच्या प्राथमिक शेअर विक्रीमध्ये (आयपीओ) प्रत्येकी दोन रुपये दर्शनीमूल्य असलेल्या जास्तीत जास्त १,८०,८५,२४६ पर्यंतच्या शेअरची ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे. या ऑफर फॉर सेलमध्ये प्रवर्तक विक्री भागधारकांकडून १९,६०,००० शेअर, प्रवर्तक समूह विक्री भागधारकाकडून ३,३९,७०० शेअर आणि गुंतवणूकदार विक्री भागधारकांकडून १,५६,३५,०४६ शेअरचा समावेश आहे.

# औद्योगिक उत्पादनवाढ उच्चांकी

## नोव्हेंबरमध्ये औद्योगिक निर्देशांक दर ६.७ टक्क्यांवर



नवी दिल्ली, ता. २९ : देशातील औद्योगिक उत्पादन या वर्षी नोव्हेंबरमध्ये ६.७ टक्क्यांच्या दोन वर्षांतील उच्चांकी पातळीवर पोहोचले आहे. खाणकाम आणि उत्पादन क्षेत्रातील दमदार कामगिरीमुळे ही वाढ झाली असून, ‘जीएसटी’ दरांमध्ये कपात केल्यामुळे मिळालेल्या ऑर्डरच्या वाढीमुळे हे प्रामुख्याने शक्य झाले आहे. औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या (आयआयपी) स्वरूपात मोजले जाणारे कारखान्यांमधील उत्पादन नोव्हेंबर २०२४ मध्ये पाच टक्क्यांनी वाढले होते. यापूर्वीची उच्चांकी वाढ नोव्हेंबर २०२३ मध्ये ११.९ टक्के नोंदवली गेली होती, असे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने म्हटले आहे.

देशातील मागणी आणि वापर वाढवण्यासाठी, २२ सप्टेंबरपासून वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) दरांमध्ये कपात करण्यात आली होती, याचा फायदा घेण्यासाठी उत्पादन ऑर्डरमध्ये वाढ झाली. ‘एनएसओ’च्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबर २०२५ मध्ये उत्पादन क्षेत्राटी वाढ आठ टक्क्यांनी झाली. खाणकाम उत्पादनात ५.४ टक्के वाढ झाली, वीज उत्पादनात १.५ टक्क्यांनी घट झाली. उत्पादन क्षेत्रात, २३ पैकी २० उद्योग गटांनी सकारात्मक वाढ नोंदवली आहे. भांडवली वस्तूंच्या विभागात नोव्हेंबरमध्ये १०.४ टक्के वाढ झाली. ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनात अहवाल दिलेल्या महिन्यात १०.३ टक्के वाढ झाली, पायाभूत सुविधा विभागात नोव्हेंबरमध्ये १२.१ टक्के वाढ नोंदवली गेली, जी मागील वर्षीच्या याच कालावधीतील आठ टक्के वाढीपेक्षा जास्त आहे. नोव्हेंबरमध्ये प्राथमिक वस्तूंच्या उत्पादनात दोन टक्के वाढ झाली. आर्थिक वर्ष २६ च्या एप्रिल-नोव्हेंबर या कालावधीत, देशाच्या औद्योगिक उत्पादन वाढीचा वेग मागील वर्षीच्या याच कालावधीतील ४.१ टक्क्यांच्या तुलनेत ३.३ टक्क्यांपर्यंत मंदावला.

> अमेरिकेच्या शुल्कांचा आणि दंडांचा परिणाम काही उत्पादन क्षेत्रांवर दिसून येण्याची शक्यता आहे. दोन महिन्यांच्या कालावधीनंतर डिसेंबरमध्ये विजेच्या मागणीत वाढ झाली आहे. डिसेंबरमधील ‘आयआयपी’ वाढीसाठी हे चांगले संकेत आहेत. डिसेंबरमध्ये ‘आयआयपी’ वाढ कमी होण्याची शक्यता आहे.
>
> -अदिती नायर, मुख्य अर्थशास्त्रज्ञ, ‘इक्रा’

# सेन्सेक्स मंदावलेल्या उलाढालीमुळे घसरला

मुंबई, ता. २९ : परदेशी वित्तसंस्थांची विक्री; तसेच जगभरातील नाताळच्या सुट्टीमुळे मंदावलेली उलाढाल, यामुळे आज भारतीय शेअर बाजार अर्धा टक्क्यांच्या आसपास घसरले. ‘सेन्सेक्स’ ३४५.९१ अंशांनी, तर ‘निफ्टी’ १००.२० अंशांनी घसरला.

आज शेअर बाजारांची सुरुवात चांगली झाली होती. ‘सेन्सेक्स’ ८५ हजारांच्यावर उघडला होता. मात्र, तेथून त्याच्यात घसरण सुरू झाली आणि दिवसभर तो घसरत राहिला. दिवसअखेर ‘सेन्सेक्स’ ८४,६९५.५४ अंशांवर, तर ‘निफ्टी’ २५,९४२.१० अंशांवर स्थिरावला. घसरता रुपया, कच्च्या तेलाचे वाढलेले भाव आणि संथ जागतिक वातावरणामुळे आजच्या घसरणीला पाठबळ मिळाल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. आज ‘निफ्टी आयटी’ एक टक्का घसरला, ही त्याची सलग दुसरी घसरण आहे. तर ‘निफ्टी मेटल’ दोन टक्के घसरला. तर प्रसारमाध्यमे आणि एफएमसीजी यांचे निर्देशांक एक टक्क्यांच्या आसपास वाढले. धातुनिर्मिती कंपन्यांची सलग सात दिवस सुरू असलेली तेजी आज संपली. मिड कॅप आणि स्मॉल कॅप निर्देशांकदेखील अर्धा ते पाऊण टक्का घसरले. आज ‘सेन्सेक्स’मध्ये टाटा स्टील दोन टक्के, तर एशियन पेंट एक टक्का वाढला. एटरनल, एनटीपीसी, ॲक्सिस बँक, हिंदुस्थान युनिलिव्हर यांचे भावही वाढले, तर दुसरीकडे अदानी पोर्ट सव्वादोन टक्के घसरला.

# नववर्षात ‘एफडीआय’ वाढ?

## यंदाचा उच्चांक ओलांडण्याची सरकारला अपेक्षा

नवी दिल्ली, ता. २९ : मजबूत आर्थिक मूलभूत तत्त्वे, मोठ्या गुंतवणुकीच्या घोषणा, व्यवसाय सुलभतेत सुधारणा करण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि गुंतवणुकीशी संबंधित नवे व्यापार करार यामुळे नव्या वर्षात भारतात थेट परकी गुंतवणुकीचा (एफडीआय) ओघ लक्षणीय वाढ नोंदवेल, अशी अपेक्षा आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळातही २०२४-२५ मध्ये एकूण थेट परकी गुंतवणुकीने ८०.६२ अब्ज डॉलरचा टप्पा ओलांडला आहे. पुढील वर्षात यात आणखी वाढ होण्याचा अंदाज उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने (डीपीआयआयटी) व्यक्त केला आहे. ‘डीपीआयआयटी’ सचिव अमरदीप सिंग भाटिया म्हणाले, “सरकारने गुंतवणूकदार-स्नेही धोरणे आणि नियामक पद्धती, गुंतवणुकीवर चांगला परतावा, कुशल मनुष्यबळ, अनुपालनाचा भार कमी करणे, सुलभ मंजुरी प्रक्रिया अशी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलल्यामुळे जागतिक अनिश्चिततेच्या काळातही २०२४-२५ मध्ये ही गुंतवणूक ८०.६२ अब्ज डॉलरच्या उच्चांकावर पोहोचली आहे.

### ठळक वैशिष्ट्ये

- प्रमुख गुंतवणूकदारांमध्ये मॉरिशस आणि सिंगापूर यांचा समावेश. दोघांचा मिळून सुमारे ४९ टक्के वाटा
- त्यानंतर अमेरिका-१० टक्के, नेदरलँड्स- ७.२ टक्के, जपान- ६ टक्के आणि ब्रिटन -५ टक्के
- थेट परकी गुंतवणूक सेवा क्षेत्र, सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर, दूरसंचार, व्यापार, बांधकाम, वाहन, रसायने आणि औषधनिर्माण क्षेत्रात
- बहुतेक क्षेत्रांमध्ये स्वयंचलित मार्गाने थेट परकी गुंतवणुकीला परवानगी
- दूरसंचार, माध्यमे, औषधनिर्माण, विमा यांसारख्या क्षेत्रांमध्ये सरकारी मंजुरी आवश्यक

### ‘टायटन आय प्लस’चे नवे तंत्रज्ञान

नवी दिल्ली, ता. २९ : चष्मानिर्मिती क्षेत्रात आघाडीवर असलेल्या ‘टायटन आय प्लस’ आणि ‘झाईस इंडिया व्हिजन केअर’तर्फे ‘फोटोफ्यूजन एक्स’ हे नवीन लेन्सतंत्रज्ञान आता वापरले जाणार आहे. या तंत्रज्ञानाच्या परवान्याबाबत आणि त्याच्या वापराबाबतची घोषणा नुकतीच ‘झाईस इनोव्हेशन समिट’मध्ये करण्यात आली. या तंत्रज्ञानामुळे चष्मा वापरणे अधिक सुखद होणार असून, डोळ्यांची निगा राखली जाणार आहे.

अत्याधुनिक फोटोक्रोमिक तंत्रज्ञानामुळे उन्हात गेल्यावर काही क्षणातच काचांचा रंग अधिक गडद होऊन डोळ्यांचे संरक्षण होईल, तर सावलीत आल्यावर गडदपणा कमी होऊन तो पुर्ववत होईल. ही क्रिया वेगाने होईल. तसेच, अतिनील किरणांपासूनही डोळ्यांचे संरक्षण होईल.

# धूतपापेश्वरच्या ‘स्वामाला’मुळे रोगप्रतिकारक शक्ती बळकट



पुणे, ता. २९ : शरीरातील ऊर्जा, सहनशक्ती आणि रोगप्रतिकारक शक्ती बळकट करण्यासाठी श्री धूतपापेश्वर लिमिटेड यांच्या प्रमुख रसायन श्रेणीतील ‘स्वामाला क्लासिक’, ‘स्वामाला कंपाउंड’ आणि ‘स्वामाला नो ॲडेड शुगर’ ही उत्पादने प्रभावी ठरत आहेत.

‘स्वामाला’ हे पारंपरिक आयुर्वेदिक रसायन तत्त्वांनुसार विकसित करण्यात आले असून त्याला आयुर्वेदिक चिकित्सक तसेच ग्राहकांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत असल्याची माहिती कंपनीतर्फे देण्यात आली. स्वामाला क्लासिक हे दैनंदिन कुटुंबाच्या आरोग्यासाठी, रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आणि संतुलित पोषणासाठी उपयुक्त आहे.

तर स्वामाला कंपाउंड हे एकूण आरोग्य, जलद पुनर्प्राप्ती, अधिक ऊर्जा आणि प्रभावी रसायन गरजांसाठी साहाय्यक ठरत आहे. मधुमेह असलेल्या ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन स्वामाला क्लासिक आणि स्वामाला कंपाउंड हे ‘नो ॲडेड शुगर’ प्रकारातही उपलब्ध आहेत. आधुनिक जीवनशैलीमुळे निर्माण होणारा अशक्तपणा, थकवा आणि कमी झालेली प्रतिकारशक्ती यावर स्वामाला उपयुक्त ठरत असल्याचे सांगण्यात आले. पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक प्रक्रियांचा संगम, हे या उत्पादनांचे वैशिष्ट्य आहे. स्वामाला श्रेणी देशभरातील आघाडीच्या आयुर्वेदिक स्टोअर्समध्ये उपलब्ध आहे.

# नराधम सेंगर गजाआडच

पान १ वरून

सुनावणीदरम्यान केली. न्यायाधीशांनी सेंगर याच्या वकिलाला नोटीस जारी करीत दोन आठवड्यांत म्हणणे मांडण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी चार आठवड्यानंतर होईल. ‘उच्च न्यायालयाच्या आधीच्या आदेशाला स्थगिती दिली जात असून यापुढील वाद-प्रतिवाद केवळ जामिन स्थगितीच्या विषयावर होईल. पीडित महिलेला स्वतंत्रपणे विशेष सुटीकालीन याचिका दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे तिला परवानगी घेण्याची गरज नाही,’ असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी नमूद केले.

### लाभ उठविण्याचा प्रयत्न

‘जामिनाचा आदेश देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची छायाचित्रे समाजमाध्यमांवर व्हायरल केली जात असून ‘यांना ओळखा’ अशाप्रकारची भाषा त्यात केली जात असल्याचे सेंगर यांच्या वकिलांनी सांगितले. ‘काही लोक या प्रकरणाचा राजकीय लाभ उठविण्याच्या प्रयत्नात असल्याची आम्हाला जाणीव आहे,’ अशी टिप्पणी न्या. सूर्यकांत यांनी यावर केली.

### ‘सीबीआय’चा युक्तिवाद

गुन्हेगाराच्या शिक्षेला स्थगिती देत त्याला जामीन मंजूर करण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय कायद्याच्या विरोधातील, चुकीचा आणि समाजासाठी धोकादायक असल्याचा युक्तिवाद केंद्रीय अन्वेषण विभागाची (सीबीआय) बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केला. सेंगरची शिक्षा स्थगित करताना न्यायालयाने ‘पॉक्सो’ कायद्याच्या उद्देशाकडेच डोळेझाक केल्याचे मेहता म्हणाले.

# राज्यसेवेच्या जागांना कात्री

पान १ वरून

एकूण ८७ जागा जाहीर केल्या आहेत. विशेष म्हणजे राज्यसेवेतील तब्बल ३५ संवर्गांपैकी केवळ चार संवर्गांनाच जाहिरातीत स्थान दिले असून, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार आणि पोलिस उपअधीक्षक यांसारखी अत्यंत महत्त्वाची व विद्यार्थ्यांची मुख्य लक्ष्य असलेली पदे यंदाही जाहिरातीतून वगळली आहेत.

त्यामुळे या जाहिरातीमध्ये पदांची संख्या वाढवून या महत्त्वाच्या पदांचा समावेश करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

याविषयी विद्यार्थी मोईन शेख म्हणाला, “या वर्षीच्या जाहिरातीत उपजिल्हाधिकारी पदांचा समावेशच नाही, हे अन्यायकारक आहे. सरकार आणि आयोग यांच्यातील धोरणांमध्ये कोणताही समन्वय दिसत नाही. वर्षानुवर्षे अपार कष्ट करून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा आशेचा किरण आहे. जर या परीक्षेतच शून्य किंवा तुटपुंज्या जागा असतील, तर विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे भवितव्य काय? स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठी अभ्यासापेक्षा संघर्ष जड झाला आहे.”

# माजी विद्यार्थ्यांकडून शंभर कोटींची देणगी

## संशोधक आणि नवउद्योजकांना घडविणाऱ्या आयआयटी कानपूरच्या ‘मिलेनियम बॅच’चे दातृत्व

कानपूर (उत्तरप्रदेश), ता.२९ (पीटीआय) : देशातील अनेक आघाडीचे तंत्रज्ञ, संशोधक आणि नवउद्योजकांना घडविणारी अग्रगण्य संस्था म्हणून आयआयटी कानपूरला ओळखले जाते. आता हीच संस्था चर्चेत आली आहे ती तिच्या माजी विद्यार्थ्यांच्या दातृत्वामुळे. या संस्थेमध्ये धडे गिरविणाऱ्या २००० सालच्या माजी विद्यार्थ्यांच्या तुकडीने चक्क शंभर कोटी रुपयांची देणगी देण्याची घोषणा केली आहे. या संस्थेच्या रौप्य महोत्सवी स्नेह मेळाव्यामध्ये सोमवारी ही घोषणा करण्यात आली. एखाद्या संस्थेला माजी विद्यार्थ्यांनी एवढी मोठी देणगी देण्याची देशाच्या शिक्षण क्षेत्रातील ही पहिलीच घटना आहे.

आपल्या लाडक्या संस्थेला शिक्षण क्षेत्रामध्ये आणखी मोठी भरारी घेण्यासाठी आर्थिक बळ मिळावे, तिची संशोधन क्षमता वाढावी आणि मोठ्या प्रमाणावर समाजाला याचा लाभ व्हावा या उद्देशाने ही देणगी देण्यात आली आहे. ही दानशूर २००० सालची तुकडी ‘क्लास ऑफ मिलेनियम’ म्हणून ओळखली जाते. या तुकडीच्या विद्यार्थ्यांच्या पुढाकारानेच ‘मिलेनियम स्कूल ऑफ टेक्नोलॉजी अँड सोसायटी’ ची (एमएसटीएस) स्थापना करण्यात येईल. त्यासाठी हा निधी वापरला जाणार आहे. संस्थेमध्ये आज आयोजित करण्यात आलेल्या रौप्य महोत्सवी स्नेहमेळाव्याला जगाच्या कानाकोपऱ्यातून माजी विद्यार्थी आले होते.

> देणगीतून संस्था आणि विद्यार्थ्यांमधील मजबूत स्नेहबंध पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. या देणगीमुळे शैक्षणिक कार्याला तर बळ मिळेलच पण संशोधनासाठी यंत्रणाही अधिक मजबूत होईल. ज्या संस्थेने आपल्याला घडविले तिला काही तरी देणे लागतो, ही विद्यार्थ्यांमधील वृत्ती यामुळे वाढेल.
>
> - मनिंद्र अग्रवाल, आयआयटीचे संचालक

> माजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील भागिदारीचे हे एक उत्तम उदाहरण आहे. सर्वांच्या एकत्र येण्यातून एक मोठा सामाजिक बदल घडून येऊ शकतो, हेच यातून स्पष्ट होते.
>
> - अमेय करकरे, संसाधने आणि माजी विद्यार्थी विभागाचे अधिष्ठाता

# तिन्ही सेनादलांच्या युद्धसज्जतेला बळ

पान १ वरून

संरक्षणविषयक समितीच्या बैठकीत मंजुरी मिळाल्यानंतर या खरेदीचा मार्ग प्रशस्त होईल. अधिकृत माहितीनुसार तोफखान्यासाठी फिरता हल्ला करणारी ड्रोन-प्रणाली, हलक्या आणि कमी उंचीवर उडणारी विमाने आणि ड्रोन शोधणारे रडार, पिनाका रॉकेट प्रणालीसाठी लांब पल्ल्याचे अचूक मार्गदर्शित रॉकेट, ड्रोन ओळख आणि ते नष्ट करण्याची सुधारित प्रणाली यांच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली आहे.

**लष्करी तळांना संरक्षण कवच**

लोइटर म्युनिशन प्रणालीमुळे अचूक लक्ष्यांवर नेमके हल्ले करता येणार आहेत. हलके रडार लहान व कमी उंचीवर उडणारे ड्रोन ओळखण्यास मदत करतील. पिनाका रॉकेटची मारक क्षमता आणि अचूकता वाढेल, तर सुधारित ‘आयडीडीआयएस एमके-२’ प्रणालीमुळे लष्करी तळ आणि महत्त्वाच्या ठिकाणांचे संरक्षण अधिक मजबूत होईल. जहाजांना बंदरात सुरक्षितपणे आणण्यासाठी व हलविण्यासाठी ‘बोलार्ड पुल’ टग बोटी, लांब पल्ल्याच्या सुरक्षित संपर्कासाठी आधुनिक रेडिओ प्रणाली, अधिक उंचीवर दीर्घ काळ उडणारे मानवरहित गुप्तचर विमाने भाड्याने घेण्याच्या प्रस्तावांनाही मंजुरी देण्यात आली आहे.

mahindra LIFESPACES

**जाहीर सूचना**

मेसर्स महिंद्रा लाइफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड यांच्याद्वारे मुंबई – ४००१०१, कांदिवली (पूर्व), अकुर्ली रोड येथे असलेल्या अकुर्ली गावातील सी.टी.एस. क्रमांक १७४ए/३ असलेल्या भूखंडावर प्रस्तावित केलेल्या विकासाला महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाकडून (SEIAA) २२ डिसेंबर, २०२५ रोजी पर्यावरण मंजुरी देण्यात आली आहे. मंजुरी पत्राच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहेत आणि त्या http://parivesh.nic.in या संकेतस्थळावरही पाहता येतील.

**गल्फ ऑईल लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेड**
CIN : L23203MH2008PLC267060
नोंदणीकृत कार्यालय : इन सेंटर, ४९/५०, एमआयडीसी. १२ वा रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई - ४०००९३ दूरध्वनी : (+९१ २२) ६६४८ ७७७७
संकेतस्थळ : http://www.gulfoilltd.com / ई-मेल : secretarial@gulfoil.co.in

**भागधारकांना सूचना**
**प्रत्यक्ष भागांच्या हस्तांतरण विनंतीच्या री-लॉजमेंटसाठी विशेष खिडकी**

याद्वारे भागधारकांना सूचना देण्यात येते की, सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 दिनांक २ जुलै २०२५ च्या अटींमध्ये, गल्फ ऑईल लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेड (‘दि कंपनी’) यांनी प्रत्यक्ष भागांसाठी हस्तांतरण विनंती री-लॉजसाठी भागधारकांच्या सुविधेसाठी विशेष खिडकी चालू केली आहे. ही विशेष खिडकी ६ जानेवारी २०२६ पर्यंत खुली राहील आणि १ एप्रिल २०१९ पूर्वी मूळ स्वरूपात दाखल केलेल्या प्रत्यक्ष भागांच्या हस्तांतरण करारासाठी आणि कागदपत्रांमध्ये/प्रक्रियेमध्ये/इतर कारणांच्या त्रुटीमुळे नाकारण्यात आलेल्या/परत पाठविलेल्या/पोहोच नसलेल्यासाठी फक्त उपलब्ध राहील.
सेबी परिपत्रकांच्या संदर्भानुसार, जर कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी (RTA) म्हणजेच कफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड यांना हस्तांतरण कागदपत्रे व्यवस्थित आढळली तर हस्तांतरित केलेले भाग फक्त डीमॅट पद्धतीने जारी केले जातील. आरटीएकडे हस्तांतरणासाठी कागदपत्रे पुन्हा दाखल करताना भागधारकांकडे डीमॅट खाते असणे आवश्यक आहे आणि त्याने त्याची क्लायंट मास्टर लिस्ट, हस्तांतरण कागदपत्रे आणि भाग प्रमाणपत्रासह पुरविणे आवश्यक आहे. अशा हस्तांतरण-सह-डीमॅट विनंतीसाठी योग्य प्रक्रिया अवलंबली जाईल. ६ जानेवारी २०२६ नंतर सादर केलेल्या हस्तांतरण विनंत्या कंपनी/आरटीए स्वीकारणार नाहीत.
पात्र भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वर नमूद कालावधीत कंपनीचे आरटीए यांच्या कार्यालयात संपर्क साधावा: **कफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड,** युनिट: गल्फ ऑईल ल्युब्रिकंट्स इंडिया लिमिटेड, पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ आणि ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली मंडळ, हैदराबाद - ५०० ०३२, तेलंगणा. संबंधित मदतीसाठी टोल-फ्री क्रमांक: १८०० ३०९४ ००१; व्हॉट्सअॅप क्रमांक: (+९१) ९१० ००९ ४०९९; ईमेल: einward.ris@kfintech.com, संकेतस्थळ: www.kfintech.com.

**गल्फ ऑईल लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेडकरिता**
**सही/-**
**आशिष पांडे**
**कंपनी सचिव**
**ठिकाण: मुंबई**
**दिनांक : २९ डिसेंबर २०२५**

HINDUJA GROUP

**नेल्को लिमिटेड**
nelco unlock potential
A TATA Enterprise
CIN No. L32200MH1940PLC003164
नोंदणीकृत कार्यालय : ईएल-६, इलेक्ट्रॉनिक्स झोन, एमआयडीसी, म्हापे, नवी मुंबई- ४०० ७१०, भारत
दूरध्वनी : +९१ २२ ६७९१ ८७२८, ६७३९ ९१००
ई-मेल आयडी : services@nelco.in संकेतस्थळ : www.nelco.in

**नेल्को लिमिटेडच्या प्रत्यक्ष भागांच्या हस्तांतरण विनंतीच्या री-लॉजमेंटसाठी विशेष खिडकी.**

सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 dated 02 July 2025 च्या अटींमध्ये, भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, १ एप्रिल २०१९ च्या अंतिम मुदतीपूर्वी दाखल केलेल्या आणि कागदपत्रांमध्ये/प्रक्रियेत कमतरता किंवा इतर कारणांमुळे नाकारलेल्या/परत केलेल्या/पोहोच नसलेल्या हस्तांतरण करारांच्या फक्त री-लॉजमेंटसाठी एक विशेष खिडकी उघडण्यात आली आहे. री-लॉजमेंट खिडकी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी म्हणजेच ७ जुलै २०२५ पासून ६ जानेवारी २०२६ पर्यंत खुली राहील.
पात्र भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीचे निबंधक आणि आणि हस्तांतरण प्रतिनिधी (आरटीए) MUFG इनटाईम इंडिया प्रा. लि. येथे त्यांच्या कार्यालयीन पत्त्यावर सी-१०१, पहिला मजला, इम्बॅसी २४७, लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, ४०००८३ किंवा कंपनी सेक्रेटरी, ईएल-६, इलेक्ट्रॉनिक्स झोन, एमआयडीसी, म्हापे, नवी मुंबई-४००७१० येथे पुढील मदतीसाठी संपर्क साधावा. कोणत्याही शंकासमाधानासाठी : https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html येथे विनंती पाठवावी किंवा ritesh.kamdar@nelco.in येथे ई-मेल पाठवावा.
या कालावधीत, हस्तांतरणासाठी री-लॉज केलेल्या सिक्युरिटीज (कंपनी/आरटीएकडे प्रलंबित असलेल्या विनंतीच्या समावेशासह, आजच्या दिनांकापर्यंत) RTA द्वारे एकदा सर्व कागदपत्रे व्यवस्थित आढळल्यानंतरच फक्त डीमॅट पद्धतीने जारी केल्या जातील. RTA यांच्याकडे हस्तांतरणासाठी कागदपत्रे री-लॉज करताना लॉजरकडे डीमॅट खाते असणे आवश्यक आहे आणि त्याने त्याची क्लायंट मास्टर लिस्ट (‘CML’) तसेच हस्तांतरण कागदपत्रे आणि भाग प्रमाणपत्रे पुरविणे आवश्यक आहे.

**नेल्को लिमिटेडकरिता**
**सही/-**
**रितेश एन. कामदार**
**कंपनी सचिव आणि हेड-लीगल**
**ACS No. 20154**
**ठिकाण : नवी मुंबई**
**दिनांक: २९ डिसेंबर २०२५**

**Govt. of Jharkhand**
**Energy Department**
**Jharkhand Renewable Energy Development Agency (JREDA)**
**3rd Floor, S.L.D.C. Building, Kusai Colony, Doranda, Ranchi-834002., Ph.: 0651-2491161, Fax.: 0651-2491165, E-mail: info@jreda.com; Website: www.jreda.com**

**NIB CANCELLATION NOTICE**
**NIB NO.: 10/JREDA/SPP/PAL/25-26**

It is to inform that due to non-feasibility of site, the NIB No.: **10/JREDA/SPP/PAL/25-26** for “**Request for Proposal (RFP) for Design, Engineering, Procurement & Supply, Construction, Commissioning and Comprehensive Operation & Maintenance of Cumulative 09 MW (AC) Grid Connected Ground Mounted Solar Power Plant, for a period of 25 years on Government Land at Palamu District of Jharkhand**” is hereby cancelled.

Reference PR No. is 359401.

**Sd/-**
**Director,**
**JREDA, Ranchi.**

**PR 369637 Energy(25-26)#D**

विश्रमो लोकतंत्राधिकारा ॥
**खोपोली नगरपरिषद**
KMC
खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं. ४१० २०३
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, फॅक्स :- ०२१९२-२६४२११
Email ID :- cokmckhopoli@gmail.com

जा.क्र. केएमसी/जीईए/ईएसटी/आरोग्य/४०५२ दिनांक : २९/१२/२०२५

**आरोग्य विभाग**
**ई-निविदा सुचना २०२५-२६**

खोपोली नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील ई-निविदा सुचना क्र. ०१ (कामाचा कालावधी- सलग ०३ वर्षे) मधील कामासाठी तसेच शासन निर्णयाप्रमाणे अनुभवी व इच्छुक ठेकेदाराकडील खाजगी संस्थाकडुन व्दिलिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सुचना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.३०/१२/२०२५ पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

निविदा आयडी क्र. १२६४००६

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| **(रणजीत पवार)** | **(छाया अहिरे)** | **(संतोष तळपे)** |
| **आरोग्य विभाग प्रमुख तथा उपमुख्याधिकारी खोपोली नगरपरिषद** | **अंतर्गत लेखापरिक्षक खोपोली नगरपरिषद** | **लेखापाल खोपोली नगरपरिषद** |

नोंदणी क्र. ६५८० स्थापना - १०.१२.१९२९

**ठाणे व पालघर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित, ठाणे-पालघर**
रामचंद्र नगर क्र. ३, वैतीवाडी, पो. वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४.
E-mail ID : thanezillhaprashikshakpat@gmai.com

**निविदा सूचना**

ठाणे व पालघर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित, ठाणे-पालघर या पतसंस्थेस मु.पो.ता. विक्रमगड, जि. पालघर येथे शाखा कार्यालयासाठी मध्यवर्ती ठिकाणी असणारी व्यावसायिक जागा/सदनिका खरेदी करावयाची असून, त्यासाठी इच्छुक विकासक अथवा जागा मालक अथवा कुलमुखत्यारपत्रधारक यांचेकडून जागेच्या दराबाबत निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फॉर्म संस्थेच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तपशिल खालीलप्रमाणे -

१) संबंधित जागा अंदाजे ४०० ते १००० चौ. फूट असावी.
२) जागा सर्व मंजुऱ्या घेतलेली व निर्धोक असावी. (टायटल क्लिअर सर्च रिपोर्ट)
३) जागेची प्रती चौरस फूट दर संस्थेच्या निविदा अर्जामध्ये नमूद करून ते सीलबंद लिफाफ्यात संस्थेच्या कार्यालयात दि. ३०.१२.२०२५ ते ०६.०१.२०२६ या कालावधीत स्विकारण्यात येतील.
४) निविदा आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. ०६.०१.२०२६ अखेर सायंकाळी ०४.०० वा. पर्यंत स्विकारण्यात येतील.
५) कोऱ्या निविदा अर्जाची किंमत रु. १,०००/- इतकी आहे.
६) निविदा स्विकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.

ठाणे
दि. ३०.१२.२०२५

| दिनेश संखे | प्रेरणा शेलवले | विठ्ठल ठाणगे | विजय रॉड्रीग्ज | प्रशांत घागस |
|---|---|---|---|---|
| अधिक्षक | खजिनदार | चिटणीस | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**ठाणे व पालघर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित, ठाणे-पालघर**